शुक्रवार, दि. १७ ऑक्टोबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ५८ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# महापालिकेवर अविश्वासाची छाया ; काळा कारनाम्याचा पडदाफाश

## जालना आयुक्त संतोष खांडेकर रंगेहात पकडले; दहा लाखांची रोकड जप्त

**जालना । प्रतिनिधी** - जालना महानगरपालिकेच्या भ्रष्टाचाराच्या साम्राज्यावर अखेर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने हातोडा ठोकला! आयुक्त संतोष खांडेकर यांना दहा लाखांची लाच घेताना रंगेहात पकडण्यात आल्यानंतर प्रशासनातील काळ्या कारनाम्यांचा पडदा फाटला आहे. गेल्या काही वर्षांपासून विकासकामांच्या नावाखाली सुरू असलेल्या भ्रष्टाचाराच्या मालिकेला आता ठोस पुराव्यांसह चेहरा मिळाला आहे.




**जालना । प्रतिनिधी** - जालना महानगरपालिकेच्या भ्रष्टाचाराच्या साम्राज्यावर अखेर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने हातोडा ठोकला! आयुक्त संतोष खांडेकर यांना दहा लाखांची लाच घेताना रंगेहात पकडण्यात आल्यानंतर प्रशासनातील काळ्या कारनाम्यांचा पडदा फाटला आहे. गेल्या काही वर्षांपासून विकासकामांच्या नावाखाली सुरू असलेल्या भ्रष्टाचाराच्या मालिकेला आता ठोस पुराव्यांसह चेहरा मिळाला आहे.

जालना महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (ACB) पथकाने रंगेहात पकडल्याने शहरातील प्रशासकीय आणि सामाजिक वातावरण तणावाने भरले आहे. आयुक्तांच्या शासकीय निवासस्थानी गुरुवारी सायंकाळी एसीबीने सापळा रचून दहा लाख रुपये रोख जप्त केले असल्याची माहिती प्राथमिक तपासात समोर आली आहे. ही रक्कम लाच म्हणून स्वीकारली जात असल्याचे विभागाच्या प्राथमिक अहवालात नमूद आहे.

प्राप्त माहितीनुसार, आयुक्त खांडेकर यांनी महानगरपालिकेतील विविध विकासकामांच्या बिलांची रक्कम मंजूर करण्यासाठी ठेकेदारांकडून लाच मागितली असल्याची तक्रार एसीबी समोर आली.

तक्रारीच्या आधारे एसीबीने चौकशी सुरू केली आणि गुरुवारी संध्याकाळी जालन्यातील आयुक्त यांच्या निवासस्थानी सापळा रचून कारवाई केली. कारवाईदरम्यान दहा लाख रुपयांची रोकड जप्त करण्यात आली. प्राथमिक तपासात ही रक्कम लाच स्वरूपात स्वीकारली जात असल्याचा निष्कर्ष आला आहे.

सध्या एकूण मागितलेली लाच रक्कम किती होती, निवासस्थानाहून अन्य किती रक्कम जप्त करण्यात आली. कागदपत्रे ताब्यात घेतली का? हा तपशील अधिक चौकशीद्वारे स्पष्ट होणार आहे. गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरु असल्याने एसीबीने माध्यमांना अधिकृत प्रेस नोट देणार असल्याचे सांगितले आहे.

> आयुक्त पदावर असलेल्या व्यक्तीकडे उच्च नैतिक मानके अपेक्षित असतात; त्यामुळे या प्रकारच्या घटनांमध्ये सरकार आणि प्रशासनाला कठोरता दाखवावी लागेल.

स्थानिक वर्तुळातून मिळालेल्या माहितीनुसार, खांडेकर यांच्यावर पूर्वीदेखील ठेकेदारांकडून बिल काढण्याच्या उद्देशाने पैसे मागितल्याचे आरोप अनेकदा झाले होते. तथापि, या प्रकारचे आरोप आधी तात्पुरते निश्चीत होऊन गेले होते किंवा त्यांच्या विरोधात ठोस कारवाई न झाल्यामुळे स्थानिक लोकांचा रोष वाढला होता. महापालिकेवरील प्रशासनाचे कामकाज, सोयीसुविधा आणि ठेकेदारांशी व्यवहार हे नागरी जीवनाच्या दृष्टिकोनातून अत्यंत संवेदनशील असते; म्हणूनच आयुक्ताच्या नेतृत्वाखाली चालणाऱ्या कामकाजावरून चुकल्यास लोकांचा विश्वास घटतो.

एसीबी कार्यालयाबाहेर या कारवाईनंतर शहरातील विविध सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते व स्थानिक जनतेची मोठी गर्दी झाल्याचे पहायला मिळाले. काही सामाजिक कार्यकर्त्यांनी एसीबीच्या कर्मचाऱ्यांनी पकडण्याचे काम केल्यानंतर त्यांचे अभिनंदन करून फटाके फोडून आनंद व्यक्त केला.

अनेक स्थानिक नागरिक आणि सामाजिक संघटनांनी तातडीने खांडेकर यांना निलंबित करावे आणि त्यांच्या राहत्या घरी संपूर्ण चौकशीसाठी उच्चस्तरीय कमिशनरी किंवा विशेष समिती नेमावी, अशी मागणी केली आहे.

काही ठेकेदार व अभियंते यांच्यातही मोठी खळबळ असून, महापालिकेतील कामकाजात अडचणी येण्याची चिंता व्यक्त केली जात आहे. ठेकेदार वर्गाचा दावा आहे की, काही वेळा व्यवस्थापनात असलेल्या अनियमित पद्धती मुळे व्यवहार कठीण झाले होते. परंतु तेही यापुढे पारदर्शकतेची मागणी करत आहेत.

एसीबीने प्राथमिक खटला नोंदवून तपास सुरू केला आहे. पुढील टप्प्यात संदिग्ध रोख रक्कमेचे स्रोत तपासणे, व्यवहाराचे, ठेकेदारांशी झालेल्या संवादाचे दस्तऐवजीकरण तपासणे व संबंधित बैंक व्यवहारांची चौकशी करणे अपेक्षित आहे.

एसीबीकडून सादर होणाऱ्या अधिकृत प्रेस नोटमध्ये गुन्ह्याचा प्रकार लाच, भ्रष्टाचार/खासगी फाईल स्टॅम्प, मनी लॉण्ड्रिंगशी संबंध याची स्पष्ट माहिती येईल. यानंतर स्थानिक पोलीस ठाण्यात किंवा एसीबीकडे गुन्हा दाखल करुन पुढील वैधानिक कार्यवाही सुरु होईल.

प्रकरण पोलिस आणि न्यायालयीन प्रक्रियेत जातो तेव्हा अधिक तपशील ई-मेल, व्हॉट्सअॅप संवाद, बँक लेनदेन, तृतीय पक्षांचे साक्षीदार महत्त्वपूर्ण ठरतील. एसीबीचे पुढील पुरावे आणि साक्षीदारांचे विधान हे केसच्या दिशानिर्णयासाठी निर्णायक ठरतील.

महापालिकेच्या कारभारावरून नागरिकांचा विश्वास घटल्यास स्थानीय निवडणूक स्थितीमध्ये या घटनेचा प्रभाव दिसू शकतो. विरोधक याचा उपयोग प्रशासनावर टीका करण्यासाठी करतील आणि स्थानिक राजकारणात तणाव वाढू शकतो.

प्रशासनाच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता व बांधकाम तसेच देयक मंजुर प्रक्रियेत सुधारणा करावी, अशी मागणी वाढेल. विभागीय आयुक्त तसेच जिल्ह्यातील प्रशासनाने यासंबंधी मार्गदर्शक धोरण काढण्याचा प्रयत्न करावा, अशी अपेक्षा आहे.

महापालिकेतील कर्मचाऱ्यांच्या मनोबलावरही परिणाम होऊ शकतो; कामकाजात पुढील काही काळात शंकास्पद निर्णयांवर न्यायिक व प्रशासकीय लक्ष असेल.

लोकांनी त्यांच्या लोकप्रतिनिधींकडून स्वच्छ प्रशासन व सार्वजनिक निधीचे योग्य, पारदर्शक वितरण अपेक्षित असते. सार्वजनिक निधीवर आघात केल्यास नागरिकांचा विश्वास घटतो आणि सेवांवर परिणाम होतो. आयुक्त पदावर असलेल्या व्यक्तीकडे उच्च नैतिक मानके अपेक्षित असतात; त्यामुळे या प्रकारच्या घटनांमध्ये सरकार आणि प्रशासनाने कठोरता दाखवावी लागेल.

या घटनेतून प्रशासन व स्थानिक स्वराज्य संस्थांना तीन मोठे धडे मिळतात, बिल मंजुरी प्रक्रिया, ठेकेदार निवडी आणि देयक व्यवहार यांची ऑनलाईन, नोंदीकरणी पारदर्शकता असावी., निरीक्षण व लेखापरीक्षण बळकट करावे - महापालिका खर्चावर स्वतंत्र लेखापरीक्षण, सार्वजनिक डिस्लोजर आणि तक्रारींबाबत जलद चौकशी यंत्रणा असावी., त्वरित प्रशासनिक कारवाईने विश्वास राखणे शक्य असल्याने आरोप झाले की तातडीने स्वतंत्र चौकशी करून निष्कर्ष जाहीर करणे आणि दोषी आढळल्यास कठोर उत्तरदायित्व ठरविणे आवश्यक आहे; तेव्हाच लोकांच्या मनात प्रशासनातल्या परिवर्तनाचा विश्वास बसेल.

एसीबीकडून अधिकृत प्रेस नोट आणि तपासाचा अहवाल जाहीर केला जाईल. त्यानंतरच गुन्हा नोंदणीचा तपशील आणि नेमके कायदेशीर आरोप यांची माहिती सार्वजनिक केली जाईल. स्थानिक सामाजिक संघटना आणि राजकीय गट या प्रकरणावर लक्ष ठेवतील आणि आवश्यकतेनुसार सार्वजनिक निदर्शने, पदयात्रा किंवा न्याय मागण्याच्या माध्यमांचा वापर करतील. महापालिकेने अंतर्गत प्रशासन सुधारण्यासाठी व सार्वजनिक विश्वास पुन्हा मिळविण्यासाठी तातडीने आणि पारदर्शक उपाययोजना जाहीर केल्या तर हा नकारात्मक परिणाम काही प्रमाणात कमी होऊ शकतो.

हे प्रशासन लोकांचा पैसा आणि विश्वास दोन्ही लुटत होतं. ही कारवाई योग्य दिशेने पहिले पाऊल आहे. लहानसहान कामांसाठीही टक्केवारीशिवाय फाइल हलत नव्हती. ही घटना जाग येण्याची घंटा आहे.

एसीबीने खांडेकर यांच्या निवासस्थानी सापडलेल्या रोकडीबाबत सविस्तर तपास सुरू केला आहे. त्यांच्या बँक खात्यांतील व्यवहार, अचल संपत्ती, आणि ठेकेदारांशी आर्थिक संबंध तपासले जात आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, पुणे आणि सांगोला येथे त्यांच्या नावावर असलेली मालमत्ता, तसेच त्यांचे निकटवर्तीयांच्या खात्यातील व्यवहार यांची तपासणी सुरु असल्याचे माहिती खात्रीलायक सुत्रांकडून मिळत आहे. नागरिकांचे म्हणणे आहे, हा फक्त एकाच माणसाचा प्रश्न नाही, संपूर्ण व्यवस्थेत पारदर्शकता आणण्याची वेळ आली आहे. याला उदाहरण म्हणून ठेवले पाहिजे, म्हणजे इतर अधिकारी धडा शिकतील.

### मालक अन् नौकर मीच...

आयुक्त संतोष खांडेकर हे जालना शहर महानगर पालिकेत आयुक्त म्हणून कार्यरत आहेत. मात्र, महानगर पालिकेच्या निवडणुकांचा कार्यकाळ संपल्यांनतर निवडणुका लांबल्या आणि त्यावर प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली. या प्रशासकाची जाबबदारीही आयुक्तांकडेच असल्यामुळे मालक अन् नौकर मीच असल्याचे भावना संतोष खांडेकर यांची प्रबळ झाली. कोणी विचारणारे नाही, कोणी पाहणारे नाही. त्यामुळे टक्केवारीचा मोह त्यांना आवरता आला नाही. आणि कामा-कामांत टक्केवारी घेत असल्यामुळे त्यांच्या विरोधातील रोष वाढत गेला. अखेर एका तक्रारदाराने हिंम्मत दाखवली आणि संत्तोष खांडेकरांची गुर्मी उर्फ मस्ती जिरवली.

### नागरिकांची मागणी

संतोष खांडेकर यांना तात्काळ निलंबित करावे.
त्यांची संपूर्ण संपत्तीची चौकशी व जप्ती प्रक्रिया सुरू करावी.
महापालिकेतील गेल्या ३ वर्षांतील सर्व विकासकामांचे ऑडिट करावे.
ठेकेदार आणि अभियंत्यांच्या व्यवहारातील पारदर्शकतेचा तपास करावा.

## खांडेकरांवर सोशल मीडियावर संतापाचा भडका; याला जेलमध्येच ठेवा! - जालनेकरांचा उद्रेक

महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर लाचलुचपत प्रकरणात रंगेहात पकडल्याच्या घटनेनंतर जालना शहरातील नागरिक, सामाजिक संघटना आणि राजकीय वर्तुळात संताप उसळला आहे. विशेषतः सोशल मीडियावर खांडेकरांविरुद्ध रोषाचा भडका उडाला असून, नागरिकांनी थेट हा सुटू नये, जेलमध्येच राहू द्या, नाल्या साफ करायला पाठवा, पुन्हा पदभार देऊ नका, त्यांची संपत्ती जप्त करा अशा कठोर प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.


एसीबीच्या कारवाईनंतर काही तासांतच फेसबुक, व्हॉट्सअॅप, आणि इन्स्टाग्रामवर पोस्ट, कमेंट्स आणि व्हिडिओ क्लिप्स व्हायरल झाल्या. नागरिकांनी संतोष खांडेकर यांच्या विरोधात तिखट शब्दांत प्रतिक्रिया देत म्हणाले:

एका प्रकरणात दहा लाख घेतो, तर वर्षभरात किती माया जमविली असेल?, असे अधिकारी शहराच्या विकासाचा गळा घोटतात., याला जेलमध्येच ठेवा, पुन्हा प्रशासनात घेऊ नका!, महापालिकेच्या नावाने लाज वाटावी, नाल्या साफ करायला पाठवा! या पोस्टना हजारो शेअर्स आणि शेकडो प्रतिक्रिया मिळाल्या असून, नागरिकांनी आता मनपाची स्वच्छता मोहिम सुरू केली आहे.

कारवाईचे वृत्त जालना शहरात वणव्याप्रमाणे पसरले. रात्री उशिरापर्यंत एसीबी कार्यालयाबाहेर मोठी गर्दी जमली, नागरिकांनी फटाके फोडले आणि भ्रष्टाचार मुर्दाबाद, खांडेकरांना अटक करा, महापालिकेचा हिशेब द्या अशा घोषणा दिल्या.

**रोष पाहून केशव कानपुडे यांचा पलायन प्रसंग**

घटनास्थळी पोलीस आणि महानगरपालिकेतील काही अधिकारी पोहोचले होते. त्यामध्ये जालना शहर महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारी केशव कानपुडे हेही होते. मात्र, जमलेल्या जनसमुदायाचा वाढता रोष आणि घोषणाबाजी पाहून त्यांनी तेथून घाईघाईने माघार घेतली. लोकांनी संपूर्ण प्रशासन भ्रष्टाचारात गुंतलेले आहे अशी हाक दिल्यानंतर त्यांनी गाडी वळवून घटनास्थळ सोडल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.





## संपादकीय

### अन्नाची नासाडी; सामाजिक गुन्हा

संपूर्ण जगात आज जागतिक अन्न दिन म्हणून साजरा केला गेला. जगभरात विविध दिन उत्साहात साजरे केले जातात. त्यापैकी अन्न दिन महत्वाचा मानावा लागेल, कारण त्याचा थेट मानवी जीवनाच्या आस्तित्वाशी संबंध आहे. अन्न सुरक्षेबाबतची एकंदर परिस्थिती पाहता अन्न दिनाबाबत जागरूकता वाढीस लागण्याची गरज आहे. परंतु आजही आपण अन्न सुरक्षेबाबत आणि अन्नाच्या नासाडी बाबत गंभीर नाहीत असेच म्हणावे लागेल. अन्न हे पूर्णब्रह्म आहे अशी आपली संस्कृती सांगते पण ही संस्कृती आपण विसरत चाललो आहे की काय असा प्रश्न पडावा असा एक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. संयुक्त राष्ट्रे पर्यावरण कार्यक्रम आणि भागीदार संस्था डब्ल्यूआरएपी चा अहवालानुसार आपल्या देशात दरवर्षी ६८ दशलक्ष टन धान्याची नासाडी केली जाते. यातील ६१ टक्के अन्न घरातून, २६ टक्के अन्न सेवांमधून तर १३ टक्के अन्न किरकोळ क्षेत्रात वाया जाते. भारतासारख्या कृषिप्रधान देशात इतक्या मोठ्या प्रमाणात अन्न वाया जाणे ही भूषणावह बाब नाही. भारतासारख्या विकसनशील देशात जिथे दररोज साठ टक्के लोक उपाशी किंवा अर्धपोटी झोपतात तिथे अन्नाची अशी नासाडी परवडणारी नाही. वाया जाणारे हे अन्न जर गोरगरिबांच्या, भुकेल्यांच्या मुखात पडले तर देशात कोणीही उपाशी झोपणार नाही पण आपल्याला आपल्या संस्कृतीचा विसर पडत चालला आहे. आपल्याला हवे तेवढेच अन्न पानात काढून घ्यायचे आणि तेवढेच खायचे अशी आपली परंपरा आहे. खाऊन माजावे पण फेकून माजू नये अशी आपली आजी सांगायची हेही आपण विसरून गेलो आहोत. पाश्चात्य देशात हॉटेलातही पानातले अन्न टाकणे हा सामाजिक गुन्हा मानला जातो. भुकेने व्याकुळ झालेल्या लोकांची आठवणही अन्न टाकून देणाऱ्या या सोकावलेल्या श्रीमंतांना येत नाही. अन्नाची नासाडी हा सामाजिक गुन्हा आहे याचे भान अन्न टाकून देणाऱ्या श्रीमंतांना राहिले. नाही. पोटातील भुकेची आग भागवण्यासाठी देशातील कोट्यवधी लोक भीक मागतात. आदिवासी, दुर्गम भागात आजही लाखो लोक पुरेसे अन्न मिळत नाही म्हणून कुपोषित आहेत तर दुसरीकडे दररोज लाखो टन अन्न फेकून दिले जाते ही विसंगती बदलायला हवी. वाया जाणारे हे अन्न गोरगरिबांच्या मुखात पडेल अशी व्यवस्था असायला हवी. हैदराबाद, चेन्नई, दिल्ली, कोलकाता, मुंबई, बंगळुरु यासारख्या मोठ्या शहरात हॉटेल, रेस्टॉरंट, घरात उरलेले अन्न गरिबांना मिळावे यासाठी कम्युनिटी किचन ही संकल्पना अमलात आणली गेली. या संकल्पनेनुसार शहरातल्या विविध भागातल्या रस्त्यावरच्या कम्युनिटी किचन च्या केंद्रातल्या मोठ्या फ्रीजमध्ये उरलेले अन्न ठेवले जाते. भुलेल्यांनी ते काढून घ्यावे अशी सुविधा या केंद्रात आहे पण ही संकल्पना शहरातील मोठ्या शहरातच आहे, ती ही व्यापक नाही. कम्युनिटी किचन सारखी संकल्पना प्रत्येक शहरात व्यापक स्वरूपात राबवायला हवी म्हणजे वाया जाणारे अन्न भुलेल्यांच्या मुखात जाईल आणि अन्नाची नासाडीही थांबेल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# कार्यकर्ता हीच भाजपाची ताकद; स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत भाजपाचाच झेंडा फडकेल

## आमदार बबनराव लोणीकरांनी व्यक्त केला विश्वास



**परतूर । प्रतिनिधी -** भाजपचा खरा आत्मा हा कार्यकर्ता आहे. भाजप ही कार्यकर्त्यांची पार्टी आहे. प्रत्येक निवडणूक ही संघटन, नियोजन आणि कार्यकर्त्यांच्या सक्रिय सहभागातूनच जिंकली जाते. त्यामुळे आता केवळ घोषणांवर नव्हे, तर कृतीवर भर द्यावा लागेल. भारतीय जनता पक्षाची खरी ताकद ही पक्षाचे निष्ठावान व सक्रिय कार्यकर्ते आहेत. त्यांच्या मेहनतीच्या बळावर येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये भाजपाचाच झेंडा फडकेल, त्यासाठी भाजपाच्या संघटनात्मक मजबुतीवर भर देणे आवश्यक असून कार्यकर्त्यांनी जनतेच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करून काम करणे अपेक्षित आहे. भाजप हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. कोणतीही निवडणूक ही संघटन आणि स्थानिक पातळीवरील मजबूत संपर्कावर जिंकता येते. त्यामुळे येणाऱ्या पंचायत समिती, जिल्हा परिषद सह स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये भाजपाचाच विजय होणार आहे. असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले.

मंठा तालुका व नेर सेवली सर्कल मधील लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठकीमध्ये आमदार बबनराव लोणीकर बोलत होते ती यावेळी पुढे बोलताना म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असतात. या निवडणुकांमध्ये पक्षाच्या यशासाठी जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. रोजच्या जीवनात जनतेला भेडसावणाऱ्या समस्या पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण, वीज, नोकरीच्या संधी यांना आपण प्राधान्य दिलं पाहिजे. या प्रश्नांवर ठोस उपाययोजना आणि कामगिरी मांडली, तर जनता आपल्याला पाठिंबा नक्की देईल. केवळ निवडणुकीच्या वेळी प्रचार करून चालणार नाही. वर्षभर कार्यकर्ते जनतेच्या संपर्कात राहिले पाहिजेत. त्यांच्या अडचणी ऐकून घेतल्या पाहिजेत. हीच भाजपची कार्यपद्धती आहे. भाजपचा उद्देश केवळ सत्ता मिळवणे नाही, तर पारदर्शक आणि जनहितकारी प्रशासन देणे हा आहे. स्थानीय स्वराज्य संस्थांमधून आपण हे मॉडेल उभारू शकतो, याची जनता आत्मविश्वासाने जाणीव करून देईल.

**अतिवृष्टी अनुदानाचे परतुर विधानसभा मतदारसंघासाठी १०० कोटी रुपये मंजूर; डीबीटी द्वारे शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा होणार**

परतूर विधानसभा मतदारसंघातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी आहे. राज्य शासनाच्या माध्यमातून रु १०० कोटींचा अनुदान निधी मंजूर करण्यात आला असून, हा निधी डीबीटी प्रणालीद्वारे थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये जमा होणार असल्याची माहिती आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली. या संदर्भात माहिती देताना आमदार लोणीकर म्हणाले की, या वर्षी परतूर विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण जालना जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर शेतीचे नुकसान झाले. शेतकऱ्यांना वेळेवर आणि थेट आर्थिक मदत मिळावी यासाठी राज्य सरकारने तातडीने निर्णय घेतला आहे. रु १०० कोटींचा निधी मंजूर झाला असून, त्याचे वाटप लवकरच सुरू होईल. यामध्ये मंठा तालुक्यातील ७१३०३ तर परतूर तालुक्यातील

**शेतकऱ्यांना दिलासा**

या निधीचे वितरण डिबीटी प्रणालीद्वारे करण्यात येणार असल्यामुळे कोणतीही मध्यस्थी न करता रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल. त्यामुळे पारदर्शकता आणि वेग या दोन्ही गोष्टी साध्य होणार आहेत. या निधीतून परतूर विधानसभा क्षेत्रातील हजारो शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीबद्दल आर्थिक मदत मिळणार आहे. पीक नुकसानीचा पंचनामा पूर्ण झालेला असून त्यानुसार संबंधित शेतकऱ्यांना लवकरच निधी मिळणार आहे. शेतकरी संकटात असताना सरकार त्याच्या पाठीशी उभे आहे, हे या निर्णयातून दिसून येते. केवळ घोषणा नाही, तर प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे हे आमचे धोरण आहे. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

**संघटनबांधणीसाठी विशेष मोहिम**

भाजपच्या आगामी कार्यक्रमांची माहिती देत त्यांनी सांगितले की, लवकरच सर्व मंडळ पातळीवर बैठका

बबनराव लोणीकर यांनी केले.

**विशेष मोहिम राबवण्याचे संकेत**

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजप संघटनेत विशेष मोहिम राबवण्यात येणार असून, बूथ पातळीवरील संघटन बळकटीकरण, नवीन सदस्य नोंदणी आणि प्रशिक्षण, सरकारी योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवणे, जनसंपर्क मोहिम आणि घरभेटी, विकासकामांचा आढावा आणि जनतेचा विश्वास याविषयावर भर देणे आवश्यक आहे. या बैठकीत त्यांनी स्थानिक समस्या, विकासकामे आणि केंद्र व राज्य सरकारच्या योजना तळगाळापर्यंत पोहोचवण्याबाबत कार्यकर्त्यांशी संवाद साधला. निवडणुकीपूर्वीच विकासकामांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवा. जनतेचा विश्वासच आपल्या विजयाची गुरुकिल्ली आहे, मतदारांना सरकारच्या कामांचा आणि विकास योजनांचा थेट लाभ झाल्याचे जाणवले पाहिजे. जनतेचा विश्वास आणि कार्यकर्त्यांचे समर्पण हेच भाजपच्या

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर त्यांनी भाजप कार्यकर्त्यांना सजग आणि सक्रिय राहण्याचा सल्ला दिला. कार्यकर्ता हीच भाजपाची खरी ताकद आहे. प्रत्येक गाव, प्रभाग आणि बूथ पातळीवर कार्यकर्त्यांनी सजग भूमिका बजावली, तर कोणतीही निवडणूक आपण आत्मविश्वासाने जिंकू शकतो. अनेकदा स्थानिक निवडणुकीकडे दुर्लक्ष केले जाते, पण याच निवडणुका जनतेच्या दररोजच्या गरजांशी निगडित असतात. या निवडणुकांमधूनच आपल्याला सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळते असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

**मंठा शहरात दलित वस्ती अंतर्गत १ कोटी २० लाखांच्या विकासकामांचे भूमिपूजन**

मंठा शहरातील विविध दलित वस्ती अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या १ कोटी २० लाख रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन आमदार बबनराव लोणीकर यांच्या टाकलेले एक पाऊल आहे. जनतेने आपल्यावर विश्वास दाखवला आहे. त्या विश्वासाला पात्र ठरवणे आणि त्यांचं जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करणे ही आमची जबाबदारी आहे. दलित वस्ती काम नेहमी दुर्लक्षित राहिले, पण आम्ही हे चित्र बदलत आहोत असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी म्हटले आहे.

यावेळी अंकुशराव बोराडे उत्तमराव राठोड अंकुशराव अवचार संदीप भैया गोरे गणेशराव खवणे सतीशराव निर्वळ नितीन राठोड बाबुराव शहाणे पंजाबराव बोराडे विक्रम उफाड वैजनाथ बोराडे कैलास बोराडे राजेश मोरे विलास घोडके आनंद जाधव विकास पालवे नरसिंग राठोड ज्ञानेश्वर शेजुळ जिजाबाई जाधव ॲड. उत्तमराव राठोड गजानन देशमुख श्रीनिवास देशमुख दीपक बोराडे नाथराव काकडे विठ्ठलराव काकडे सुरेशराव सरोदे विकास सूर्यवंशी शरद पालवे अमोल मोरे नितीन सरकटे दारासिंग चव्हाण रामकिसन बोडखे किशोर हनवते मोहनराव आढे गजानन उफाड विवेक काकडे सचिन राठोड रमेश वायाळ बाळासाहेब चव्हाण माऊली गोंडगे राजेभाऊ खराबे कैलास चव्हाण तानाजी शेंडगे दीपक दवणे स्वरूप सानप राजेश मस्के यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

> अतिवृष्टी अनुदानाचे परतुर विधानसभा मतदारसंघासाठी १०० कोटी रुपये मंजूर; डीबीटी द्वारे शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा होणार - आमदार बबनराव लोणीकर यांची माहिती

### राज्यस्तरीय सिनीयर नेटबॉल स्पर्धे करीता निवड चाचणीचे आयोजन



**जालना । प्रतिनिधी -** ॲम्युचर नेटबॉल असोसिएशन ऑफ महाराष्ट्र व औरंगाबाद जिल्हा नेटबॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २८ ते ३० ऑक्टोंबर २०२५ दरम्यान विभागीय क्रीडा संकुल, गारखेडा, छ. संभाजीनगर येथे आयोजीत १९ व्या राज्यस्तरीय सिनीयर नेटबॉल स्पर्धेत सहभागी होण्याकरीता दि. १८ ऑक्टोंबर २०२५ शनिवार रोजी सकाळी १० वाजल्यापासुन एस. व्ही. ईग्लीश स्कुल, पेंशनपुरा जालना येथे निवड चाचणीचे आयोजन करण्यात आलेले आहे.

सदर चाचणीत सहभागी होण्यासाठी जन्म तारखेची अट नाही, निवड चाचणीमधुन १२ मुले व १२ मुलींची निवड करण्यात येईल. निवड झालेले खेळाडु राज्यस्पर्धेत जालना जिल्हयाचे प्रतिनीधीत्व करतील. निवड चाचणी व स्पर्धेच्या अधिक माहीती करीता जिल्हा संघटनेचे सचिव शेख चाँद पी.जे. मो.नं. ९८२२४५६३६६, उमेशचंद्र खंदारकर, सुभाष पारे, सुरेश त्रीभुवन, अमोल काटकर, संतोष वाघ, अमोल सोलाट, शेख महेजबीन, गिता संगम, शेख समीर, सोहेल खान यांच्याशी संपर्क साधावा.

तरी सदर निवड चाचणीचा जास्तीत तास्त खेळाडुंनी लाभ घ्यावा असे आवाहन जालना जिल्हा नेटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष बाला परदेसी, देवगिरी प्रतिष्ठाण चे अध्यक्ष बबन दादा सोरटी, जि.ई.एस. कॅम्पस चे अध्यक्ष ज्ञानेश्वर पुंगळे पा., समन्वयक शेख अहेमद, क्रीडा अधिकारी श्रीमती लता लोंढे, श्रीमती आरती चिल्लारे, राज्य क्रीडा मार्गदर्शक सिद्धार्थ कदम, आशीष जोगदंड, तालुका क्रीडा संयोजक कृष्णा जंजाळ, प्रा. वाहेद पटेल, डॉ. शेख रफि क, प्रमोद राठोड, गुलाब राठोड, सचिन मोहीते व जिल्हा ऑलम्पीक असोसिएशन, कला क्रीडा दूत फाऊंडेशन व जिल्हा नेटबॉल असोसिएशनच्या पदाधिकार्यांनी केले आहे.



## सादर आहे

# धनादेशाची जलद वटवणी



**येथून पुढे,**
बँका त्याच दिवशी धनादेश वटवतील/परत करतील. ग्राहकांना त्याच दिवशी क्रेडिट मिळेल.

**3 जानेवारी 2026 पासून,**
बँका 3 तासांच्या आत धनादेश वटवतील/परत करतील. ग्राहकांना काही तासांत क्रेडिट मिळेल.

### याचा अर्थ काय?

- पैशांची जलद उपलब्धता
- अधिक चांगली सुविधा
- विलंब कमी होईल

### याची नोंद घ्यावी

- धनादेश बाउन्स होणे टाळण्यासाठी खात्यात पुरेशी शिल्लक ठेवा




अधिक माहितीसाठी, तुमच्या बँकेशी संपर्क साधा किंवा आरबीआयची दिनांक 13 ऑगस्ट 2025 ची अधिसूचना पहा.
अभिप्राय देण्यासाठी rbikehtahai@rbi.org.in येथे लिहा

क्यूआर कोड स्कॅन करा

अधिकृत व्हाट्सअॅप क्र. 99990 41935 / 99309 91935

जनहितार्थ जारी द्वारा
भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

VJ

सस्नेह निमंत्रण

|| श्री गणेशाय नम : ||



आम्ही आज पर्यंत व्यवसायात १०० % प्रामाणिकपणे
सर्वोत्तम सेवा देत आलो आहो, तुमचे समाधान हेच आमचे ध्येय ।
तुमचा आशिर्वाद व आलोट प्रेम दिलेले पाठबळाच्या
विश्वासाने आज आम्ही आपल्या सेवेत ।

# वरद ज्वेलर्स

विश्वास हिच परंपरा..!

# भव्य शुभारंभ

आश्विण कृ.१२ त्रयोदशी निमित्त दि. १८/१०/२०२५ शनिवार रोजी दुपारी १२.४५ मि.
करण्याचे योजिले आहे. या शुभ प्रसंगी आपण उपस्थित राहून
आमचा आनंद व्दिगुणीत करावा हि विनंती.

✻ शुभहस्ते ✻

ह.भ.प. गुरुवर्य भगवानबाबा आंनदगडकर
(आनंदगड)

✻ निमंत्रक ✻

श्री. सुधाकर भिमराव खरात पा.
श्री. सार्थक सुधाकर खरात पा.
व समस्त खरात पा. परिवार

✻ प्रतिष्ठाण ✻

श्री गणेश ज्वेलर्स, मंठा    श्री माऊली ज्वेलर्स, मंठा
श्री गणेश ज्वलेर्स, वाटुर

✻ स्थळ ✻

मातोश्री चौक, बजरंग रोड, चंदनझिरा, जालना ४३१ २०३

अमोल डिझाईन /9823947494

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.